# त्यांच्याशी संलग्न राहा

कमलेश डी. पटेल

29 मार्च 2015 रोजी सत्संगानंतर दिलेले भाषण

चेन्नई, भारत

नमस्ते,

आपल्या प्रिय गुरुदेवांनी वर्षातून तीन उत्सवांसाठी अनुमोदन दिले होते : पूज्य लालाजी महाराज, बाबूजी महाराज आणि आपले गुरुदेव यांचे जन्मोत्सव. आपल्या हृदयातून आपण सर्वच हे तीनही उत्सव साजरे करण्यासाठी सज्ज झालो आहोत, परंतु बऱ्याच बाह्य कारणांमुळे कदाचित कोणाला तिथे येणे शक्य होणार नाही. अशा उत्सवांमधील व भंडाऱ्यांमधील सत्संगांमध्ये भाग घेता येत नाही म्हणून एखाद्याने अपराधी वाटून घेऊ नये. शक्य असेल तर घरीच उत्सव साजरा करा. तुम्ही जाऊ शकत नसाल तर कृपया वाईट वाटून घेऊ नका. तुमचे हृदय जिथे असायला हवे तिथेच आहे. तुमच्या जोडीदाराची तुमच्या जाण्याला संमती नाही किंवा तुमच्या पालकांची संमती नाही किंवा आर्थिक अडचण आहे किंवा कामाच्या व्यापामुळे जाणे शक्य होत नाही, अशा कारणांमुळे कृपया हृदयाची स्थिती बिघडू देऊ नका. कोणतेही कारण असो, कृपया स्वत:वर बळजबरी करू नका. प्रत्येकाला प्रत्येक भंडाऱ्यात उपस्थित राहता येणे शक्य नाही.

आपण जर आपल्या हृदयातील आर्ततेने त्यांना साद घातली, ‘‘प्रिय गुरुदेव, माझ्या सभोवतालची परिस्थिती किती प्रतिकूल आहे हे मी तुम्हाला सांगणार नाही पण आपण उत्सव इथेच आणि आत्ताच साजरा करूया’’, तर आपण जिथे असू तिथे गुरुदेवांना आमंत्रित करू शकतो. आपले हृदय जेव्हा अशी मागणी करते, विनंती करते, तेव्हा सद्गुरू संपूर्ण सामर्थ्यानिशी तेथे असणारच. म्हणून त्यांच्याशी संलग्न राहण्यासाठी (जोडलेले राहण्यासाठी) आपण आपली हृदये तयार केली पाहिजेत, मग तो हा भंडारा असो की तो भंडारा, कारण साध्य करण्याजोगे हे एक फारच छोटेसे ध्येय झाले. ही फारच छोटीशी आकांक्षा आहे. गुरुदेवांशी सदैव संलग्न राहणे हे आपले ध्येय असले पाहिजे. ज्याप्रमाणे आपण सकाळी ध्यान करतो व नंतर ध्यानाच्या स्थितीत राहतो – आपण त्याला ध्यानमग्न अवस्था म्हणतो – संपूर्ण दिवसभर, त्याप्रमाणेच भंडारा वर्षातून तीन वेळाच असला तरी उत्सव चालूच राहिला पाहिजे. म्हणजेच, त्यांना हव्या त्या पद्धतीने आपले आयुष्य व्यतीत होत असल्याबद्दल गुरुदेवांप्रती कृतज्ञतेचा भाव कायमच जागा राहिला पाहिजे. जसजसे ते उलगडत जाते तसतसे आपण कृतज्ञता व्यक्त करीत राहतो.

सहजमार्गाचे एक महान वैशिष्ठ्य आहे की – आपल्याला मृत्यूनंतर दिव्यलोकात जाता येईल अशी वाट बघण्याची गरज नाही. ते काही एखादे भौतिक जग नाही, ती केवळ एक मिती (डायमेन्शन) आहे आणि ती आपल्याला आपल्या हृदयांच्या आत तयार करता येते व हृदयांतून अनुभवता येते. अशी अवस्था असली पाहिजे की हे जग आणि ते जग यात काहीच फरक उरता कामा नये. मला बाबूजी महाराजांच्या आत्मचरित्रातील एक परिच्छेद आठवतो, ज्यात लालाजी महाराज त्यांना म्हणतात, ''मी तुझ्यासाठी दिव्यलोकाचा त्याग केला आहे. तुझे हृदयच माझे निवासस्थान झाले आहे. यानंतर मी आता दिव्यलोकात परत जाणार नाही.'' बाबूजींनी त्यांच्या हृदयात निर्माण केलेल्या गुणवत्तेची कल्पना करा! आणि ते वचन देतात, त्यांनी ग्वाही दिलेली आहे की आपल्या सर्वांनाच अशी अवस्था निर्माण करणे शक्य आहे, ज्यात हे हृदय अगदी येथेच आणि आत्ताच दिव्यलोकासारखे बनू शकेल. मग प्रत्येकच दिवस उत्सवाचा असेल.

म्हणून मी तुम्हा सर्वांना अशा प्रकारे तयारी करण्याचा आग्रह करतो. गुरुदेवांची मदत आहेच, मी पुन्हा पुन्हा सांगतो ती आहेच. आपण भीक मागत राहतो, ''गुरुदेव, गुरुदेव कृपा करा. माझ्यावर अशा प्रकारची कृपा करा.'' ''माझ्यावर तशा प्रकारची कृपा करा.'' अशा प्रकारच्या उबग आणणाऱ्या विनंत्या करणे थांबवा. काहीतरी उच्च मागा, असे की जे मिळाल्यावर आपल्याला जीवनात इतर कशाची गरजच उरणार नाही.

भंडाऱ्यांविषयी बोलायचे तर यावेळी आपण बाबूजी महाराजांचा जन्मोत्सव लखनौ येथे साजरा करणार आहोत. कित्येक वर्षात आपण पाहत आलो आहोत की भंडाऱ्यांदरम्यान लोक कितीतरी गोष्टींच्या मागे लागलेले असतात. इतके व्यवहार ठरतात, इतक्या भागिदाऱ्या आकारास येतात, आणि आपल्यातील काहीजण गुरुदेवांच्या कुटिराभोवती अशी गर्दी करतात की जणू काही तीच एकमेव जागा आहे, जिथे कृपा व प्राणाहुती प्राप्त होऊ शकते. आणि या प्रक्रियेत आपण संपूर्ण गुरुपरंपरेचाच अनादर करीत असतो : ''मला तिथे आत जाता येत नाहीये. मला प्राणाहुती मिळत नाहीये. ते फक्त काही विशेष लोकांसाठीच आहे.'' या मिशनमध्ये कोणीही विशेष नाहीत. ते रांगेत उभे राहतात आणि कसेतरी करून दिवाणखान्यात किंवा शयनगृहात प्रवेश मिळवतात. पण मी पुन्हा पुन्हा सांगतो की तुम्ही गुरुदेवांना अगदी खेटून उभे असलात तरी, तुमचे हृदय तयार नसेल तर तुम्हाला वास्तविक गोष्ट कधीच प्राप्त होणार नाही. आणि जर तुमचे हृदय तयार असेल, तर तुम्ही लाखो मैलांवर असलात तरी तुम्हाला ती मिळेल.

म्हणून कृपया या भंडाऱ्यांचा उपयोग अधिक खोलवर जाण्याची, आत्यंतिक प्रेमाने त्यांच्या स्मरणात बुडून जाण्याची व त्यांच्या उपस्थितीत विरघळून जाण्याची एक संधी म्हणून करा. माझा

तुम्हाला एवढाच आग्रह आहे. कुटिराभोवती गर्दी करून किंवा जीवनातील निम्न स्तरावरील ध्येये साध्य करण्याच्या मागे लागून हे भंडारे खराब करू नका.
सर्वांना धन्यवाद!